




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784








वर्ष ३ रे   अंक : २१९ वा बुधवार दि २२ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८   किंमत ३ रुपये


# महायुतीत महाभारत! सुनील तटकरेंचा अत्यंत जवळचा माणूस शिवसेनेत, भरत गोगावले यांची मोठी राजकीय खेळी...

**वृत्तसंस्था/रायगड**

रायगड जिल्ह्यात महायुतीतील दोन प्रमुख घटकपक्ष शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील संघर्ष चिघळू लागला आहे. पालकमंत्री पदाच्या वादातून सुरू झालेली कुरघोडी आता आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर थेट आमनेसामनेच्या लढाईत रुपांतर झाल्याचे चित्र आहे. दिवाळीच्या मुहूर्तावर शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनी राष्ट्रवादीला मोठा झटका दिला आहे. खासदार सुनील तटकरे यांचे अत्यंत निकटवर्तीय आणि राष्ट्रवादीचे सक्रीय कार्यकर्ते विकास गायकवाड यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. गायकवाड यांच्या प्रवेशाने रायगडमध्ये राष्ट्रवादीच्या गोटात खळबळ उडाली आहे. आगामी निवडणुकांपूर्वी ही मोठी राजकीय उलथापालथ मानली जात आहे.गोरेगाव विभागातील सुनील तटकरे यांचे कार्यकर्ते विकास गायकवाड हे सुनील तटकरे यांचे विश्वासू शिलेदार मानले जात होते. त्यामुळे गायकवाड यांची गळचेपी म्हणजे तटकरे यांच्यासाठी थेट वैचारिक आणि संघटनात्मक हादरा मानला जातोय. या प्रवेश सोहळ्यावेळी भरत गोगावले यांनी सूचक भाष्य केलं. ङ्घङ्घराजकारणात योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्यास जिल्ह्याचं चित्रच बदलू शकतं,ङ्घङ्घ असं त्यांनी वक्तव्य केलं. त्यामुळे त्यांच्या पुढील रणनीतीबाबतही संकेत मिळाले आहेत. दरम्यान, महायुतीत असूनही शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीत समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध तयारी सुरू केल्याची चर्चा आहे. त्यामुळे रायगडमध्ये महायुतीतच महाभारत रंगण्याची चिन्हं स्पष्ट झाली आहेत. राजकीय वर्तुळात सध्या याच चर्चेला उधाण आले असून, ङ्घङ्घतटकरे-गोगावले संघर्षङ्घङ्घ हे आगामी निवडणुकीचे केंद्रबिंदू ठरणार असल्याचे बोलले जात आहे. रायगड जिल्ह्यात आता केवळ पक्षांतराचे नव्हे, तर वर्चस्वाच्या रणधुमाळीचे दिवस सुरू झाल्याचे



स्पष्ट होत आहे. दरम्यान, फक्त रायगड नाही तर अनेक ठिकाणी महायुतीत धुसफूस सुरु असल्याचं बघायला मिळत आहे. सोलापुरात तर राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन माजी आमदार भाजपात प्रवेश करत आहेत. दुसरीकडे पुण्यात शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांच्याकडून भाजप नेत्यांवर वारंवार वेगवेगळ्या प्रकारचे गंभीर आरोप केले जात आहेत.

# लाडकी बहीण नको रे बाबा! तिजोरीवर भार वाढला; २ मुख्यमंत्र्यांची चर्चा अन् नवा प्लान ठरला

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला जबर धक्का बसल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या आधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली. त्याचा लाभ महायुतीला विधानसभा निवडणुकीत झाला. महायुतीनं दणदणीत विजय मिळवत सत्ता कायम राखली. बिहारमध्येही सत्तारुढ एनडीए सरकार लाडकी बहीण योजना राबवण्याच्या तयारीत होतं. पण या योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर पडणारा ताण लक्षात घेता लाडकी बहिणचा विचार बासनात गुंडाळण्यात आला. त्याऐवजी एक योजना हुशारीनं राबवण्यात आली. बिहारमध्ये एनडीएची सत्ता आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार असेल तरी भाजपकडे सर्वाधिक आमदारांचं बळ आहे. बिहार निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणण्याची चर्चा सुरु होती. पण या योजनेमुळे मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीवर पडलेला भार पाहून बिहार सरकारनं स्मार्ट निर्णय घेतला. बिहारमध्ये महागठबंधनचं सरकार आल्यावर महिलांचं सक्षमीकरण करणारी योजना आणू, त्यांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा करु, असं आश्वासन राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष तेजस्वी यादव यांनी दिलेलं आहे. त्यामुळे सरकारमधील पक्षांनी याबद्दल खल सुरु केला. अखेर मुख्यमंत्री महिला रोजगार योजना आणत सरकारनं एका दगडात दोन पक्षी मारले. विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठी कोणती योजना राबवायची, याबद्दल मुख्यमंत्री नितीश कुमार आणि त्यांचे निकटवर्तीय विचार करत होते. कुमार यांच्या निकटवर्तीयांनी आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्व सर्मा यांच्याशी चर्चा केली. लाडकी बहीण योजनेमुळे महाराष्ट्राच्या तिजोरीवर पडलेला ताण, त्यामुळे गुंडाळाव्या लागलेल्या अन्य योजना याची कल्पना असल्यानं सर्मा यांनी नितीश कुमार आणि त्यांच्या निकटवर्तीयांना महत्त्वाचा सल्ला दिला. गळ्यात कायमस्वरुपी घंटा बांधून घेऊ नका, असं सर्मा यांनी सुचवलं. दर महिन्याला पैसे द्यावी लागतील, अशी योजना आणू नका. एकदाच अर्थ सहाय्य करावं लागेल, अशी योजना लागू करा. त्यातून महिलांमध्ये संदेशही जाईल आणि तिजोरीवर ताणही येणार नाही, असा मोलाचा सल्ला मुख्यमंत्री सर्मा यांनी दिला. तुम्ही एकदा महिलांना अर्थ सहाय्य करा. ज्या महिला त्या पैशांचा सदुपयोग करतील, त्यांनाच पुढे आर्थिक मदत द्या. तशा अटी, शर्ती ठेवा, असं सर्मा यांच्याकडून बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि त्यांच्या निकटवर्तीयांना सुचवण्यात आलं. त्यातून मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेचा जन्म झाला. निवडणुकीच्या तोंडावर सरकारनं योजना जाहीर केली. ७५ लाख महिलांच्या बँक खात्यांमध्ये प्रत्येकी १०-१० हजार रुपये जमा करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीहून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून योजनेची सुरुवात केली. त्यानंतर निवडणूक आयोगानं निवडणूक तारखांची घोषणा केली. आता




निवडणुकीच्या रणधुमाळीत या योजनेची चर्चा सर्वत्र सुरु आहे. मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेतून सुरुवातीला महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी १० हजार जमा झाले आहेत. रोजगार सुरु करण्यासाठी महिलांना या पैशांचा वापर करावा लागेल. ६ महिन्यांनंतर महिलांचा व्यवसाय व्यवस्थित चालत असेल आणि त्यात वाढ होण्याची शक्यता असेल तर त्यांना २ लाख रुपयांचं व्याजमुक्त कर्ज देण्याची तरतूद आहे. ज्या महिलांना व्यवसाय सुरु करता येणार नाही, त्यांना पुढे या योजनेचा लाभ मिळणार नाही.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कायद्याच्या हातापलीकडचे!

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री व आमदार यांच्या वागण्या-बोलण्याने मध्यंतरी चांगलाच गदारोळ माजला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. एक मंत्री सभागृहात भ्रमणध्वनीवर एक खेळ खेळत आहेत, असा आरोप चित्रणासकट झाला. एका मंत्रिपुत्राच्या आईच्या नावाने डान्सबार परवाना आहे, याचाही उल्लेख झाला. एका मंत्र्याच्या मुलाने मालमत्तेच्या लिलावात घोटाळा केला, असाही आरोप झाला. यात फक्त पत्ते खेळणाऱ्या मंत्र्यांचा खातेबदल झाला; पण त्या मंत्र्यांची बडतर्फी झाली नाही. याशिवायच्या इतर प्रकरणांत तर तेही झाले नाही. एका आमदाराने आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्याचेही चित्रण होते. त्यावरून चांगलीच टीका झाली. मात्र, ही टीका झाल्यानंतरही त्या आमदाराला सदनात व सदनाबाहेर कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागले नाही. यापुढेही त्याला कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, असा मतप्रवाह आहे. त्या घटनेचे चित्रण झाल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही. कदाचित चौकशी होणार असेल, किंवा प्रलंबित असेल. मात्र, उच्चपदस्थांच्या, सत्ताधाऱ्यांच्या गैरकृत्यांना आळा बसेल असे ठोस काही न केल्यामुळे समाजात चुकीचा संदेश गेला, हे लक्षात घ्यायला हवे. ही सारी प्रकरणे, घटना पाहिल्या तर, कायद्यासमोर सारे समान आणि कायद्याचे साऱ्यांना समान संरक्षण या तत्त्वाला बगल दिली गेली व ही अशी बगल दिली जाते. एरवी साधी किंवा गंभीर दुखापत, कामात अडथळे आणणे, हालचालीस प्रतिबंध करणे, अपाय करणे अशी कृत्ये ऐच्छिक किंवा मुद्दामहून केली असतील तर भारतीय न्यायसंहितेप्रमाणे त्यांस गुन्हे असे संबोधले जाईल. आमदार महोदयांनी उपाहारगृहात येऊन, तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करून जमिनीवर पाडले, असे चित्रणात दिसले. ङ्गहे जे चित्रण दिसते ते खरे नाही वा त्यातील व्यक्ती मी नाहीफ असे आमदार महोदयांनी म्हटले नाही. त्या कर्मचाऱ्याने तक्रार दिली की नाही, याने फरक पडत नसतो. वाहिन्यांवरील चित्रण पाहून स्थानिक पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी आणि शहानिशा करणे, त्या कर्मचाऱ्याची दुखापत कशा प्रकारची आहे, याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त करणे, पीडिताची जबानी नोंदवणे या अपेक्षित आणि स्वाभाविक बाबी असतात. आमदार महोदय याला अपवाद कसे ठरतात, हे आजवर उलगडले नाही. ङ्ग अदखलपात्र गुन्हा म अशी नोंद झाली असे कळते. याचा अर्थ आम्ही दखल घेणार नाही, पीडिताला वाटल्यास तो न्यायालयात खासगी तक्रार करू शकतो. दखलपात्र किंवा अदखलपात्र हा फैसला आम्हीच करणार, दुखापत साधी की गंभीर हेही आम्हीच ठरविणार; कारण आम्ही सत्ताधारी आहोत. तटस्थ, संवेदनशील, स्वतंत्र यंत्रणांना त्यांचे काम करू द्यायचे नाही व प्रकरण मिटले असे दाखवायचे. मग दिलगिरीलाही अर्थ राहत नाही. आमदार महोदय म्हणतात, की अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसेल व ते खराब, शिळा असतील तर मी पुन्हा असाच वागेन. अन्नपदार्थांच्या बाबतीत तेच सगळे निर्णय घेणार. या मग्रुरीला शिक्षा नसते असेच सामान्यांना वाटणार. मात्र, साधारण व्यक्तीने ही कृती केली असती तर त्याला व सगळ्यांनाच पोलिसी खाक्या दिसला असता. अशा साधारण व्यक्तीला कदाचित काही दिवस कोठडीत काढावे लागले असते. पीडित कर्मचाऱ्याने काय केले, वा करायचे ठरवले हे ज्ञात नाही. मुख्यमंत्र्यांकडून कडक पावले उचलली जातील, ही शाश्वती नाही. आमदाराला व मंत्र्यांना समज मिळाली, हेही नसे थोडके. मुख्यमंत्र्यांनी सदनातील आपल्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्याचे वाभाडे काढले; परंतु राज्याचे गृहमंत्री म्हणून पीडिताला संरक्षण देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नाही. त्या पीडिताला गृहमंत्र्यांकडून किंवा त्यांच्या खात्याकडून दिलासा नाही. त्याच्या कायदेशीर अधिकारांचे भान नसणारे, त्याबाबत असंवेदनशील असणारे गृहखाते जनतेला आपले कसे वाटणार, हा खरा प्रश्न आहे. शासनाच्या व्यवहारात असा ठळक भेदभाव का दिसतो? कायद्याची अंमलबजावणी करताना सरकारचा विभाग हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा नसतो, हे ध्यानात घ्यायला हवे. सत्तेत असलेला पक्ष बदलत जाईल. मात्र, शासकीय अधिकारी, विभागप्रमुख हे कायमस्वरूपी पद असते. सरकार म्हणजे कार्यपालिका, आणि तिची बांधिलकी फक्त कायदा आणि राज्य घटनेशी असते. सत्तेत असलेला पक्ष व त्या सत्ताधारी पक्षाचे मंत्री हे अधिकाऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करतात आणि अधिकारी देखील ते खपवून घेतात. कायद्याच्या कक्षेत येणारी कारवाईही गृह विभाग करत नाही किंवा त्याचा कारभार सांभाळणारा मंत्री अधिकाऱ्यांना कह्यात ठेवतो. आमदाराच्या प्रकरणात गृह खात्याने काय कुठली चौकशी केली, त्याचा अहवाल तयार केला का व तो कधी व कोणाला सादर केला याचा तपशील लोकांसमोर नाही. भारतीय न्याय संहितेतील अदखलपात्र गुन्हेच संबंधित आमदाराच्या हातून घडले, हा निष्कर्ष कशावर आधारित आहे हे कळेल का? लोकप्रतिनिधी आमदार निवासातील उपहारगृहाच्या कर्मचाऱ्यांना नुसता दटावत नव्हता, तर सर्वांदेखत शिवीगाळ, मारहाण इत्यादी करत होता. इतके सारे असूनही दखलपात्र गुन्हा घडत नाही, हे पटत नाही. लोकप्रतिनिधींना विशेष स्थान व संरक्षण नवीन संहितेत देण्यात आले आहे का, आणि तरतुदींचा असा अन्वयार्थ सत्ताधारी व विरोधी असा फरक करू देणार नाही.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# बीडकरांची दिवाळी नवीन घरकुलात

## ५० हजारांहून अधिक घरकुलांची पूर्ती करणारा बीड जिल्हा राज्यात प्रथम..!

**बीड : 'दिवाळी नवीन घरकुलात' या उपक्रमांतर्गत बीड जिल्ह्याने राज्यात विक्रमी कामगिरी केली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) तसेच राज्य पुरस्कृत घरकुल योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील ५० हजारांहून अधिक घरकुले विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आली असून, या निमित्तानं बीडकरांचे हक्काच्या घरात राहण्याचे स्वप्न साकार झाले आहे. या कामासाठी सरकारमार्फत ९९० कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे. या कामगिरीमुळे बीड जिल्ह्याने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक मिळवत नवा विक्रम रचला आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यंत्रणेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांसह लाभार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.**



### ठळक वैशिष्ट्ये

- बीड जिल्ह्यात दिवाळी नवीन घरकुलात उपक्रमांतर्गत ५० हजारांहून अधिक घरकुल पूर्ण
- सरकारमार्फत ९९० कोटी निधी वितरित
- बीड जिल्हा महाराष्ट्रात प्रथम
- चार महिन्यांत ४० हजार घरकुले पूर्ण
- काटेकोर नियोजन आणि दैनंदिन पाठपुराव्यामुळे यश
- महाराष्ट्राला अधिक उद्दिष्ट मंजूर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्य सरकारतर्फे आभार
- प्रत्येक पात्र कुटुंबाला हक्काचे घर मिळवून देण्यासाठी योजना अधिक वेगाने राबविणार

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर मिळावे, हीच या उपक्रमाम गची प्रेरणा आहे. बीड जिल्ह्यातील हजारो कुटुंबांनी यंदाची दिवाळी आपल्या नव्या घरकुलात साजरी केली, हीच या योजनेची खरी यशोगाथा आहे. प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दाखविलेली समर्पणभावना, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा हेच या योजनेच्या यशस्वीतेचे रहस्य आहे. काटेकोर नियोजन, दैनंदिन देखरेख आणि टीमवर्कचा हा विजय आहे. या उपक्रमासाठी जिल्हा प्रशासनाने विकसीत केलेल्या 'पीएमएवाय (सॉफ्ट) अॅप'चा मोठा वाटा आहे. या अॅपद्वारे प्रत्येक अधिकाऱ्याला विशिष्ट प्रभागाची जबाबदारी देण्यात आली होती. लाभार्थ्यांशी सतत संपर्क ठेवून बांधकाम सुरू ठेवण्यास त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. सूक्ष्म नियोजन, दैनंदिन पाठपुरावा आणि निधीचे वेळेत वितरण या त्रिसूत्रीम ळेच हे उद्दिष्ट चार महिन्यांत पूर्ण करणे शक्य झाले. बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली बांधकामासाठी वाळू उपलब्धता, आंतरविभागीय समन्वय व बांधकाम प्रक्रियेसाठी आवश्यक सुविधा वेळेवर पुरविण्यात आल्या.

ग्रामीण गृहनिर्माण हा शासनाचा प्राधान्याचा विषय असून, राज्य व केंद्र पुरस्कृत या योजनांना बीड जिल्ह्यात विशेष गती देण्यात आली. शाश्वत विकासाच्या ध्येयाशी निगडित या उपक्रम ात दिवाळीपूर्वी प्रत्येक लाभार्थ्याला हक्काचे घर मिळावे या उद्देशाने नियोजन करण्यात आले. बीड जिल्ह्याची स्थलांतराची पार्श्वभूमी लक्षात घेता, ऊसतोडीपूर्वीच कुटुंबांना घर मिळावे या दृष्टीने कामांना वेग देण्यात आला. परिणामी, हजारो कुटुंबांना या दिवाळीत नवीन घराचा आनंद लाभला आहे.

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत महाराष्ट्राला अधिकचे उद्दिष्ट मंजूर करून देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सर्वसामान्य कुटुंबांच्या घरकुल स्वप्नाला नवे बळ दिले आहे. राज्य सरकारतर्फे त्यांच्या या निर्णयाबद्दल मी त्यांचे मनः पूर्वक आभार मानतो. ते पुढे म्हणाले, बीड जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबाच्या डोक्यावर हक्काचे छप्पर यावे, हे आमचे पुढचे ध्येय आहे. यासाठी ही योजना आणखी वेगाने आणि प्रभावीपणे राबविण्यात येईल. बीड जिल्ह्यातील कोणतेही पात्र कुटुंब हक्काच्या घराशिवाय राहणार नाही, यासाठी शासन कटिबद्ध आहे. बीड जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांच्या, प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने बीड जिल्ह्याने हे यश मिळवले आहे. यापुढे सुध्दा बीडच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. तसेच त्यांनी या यशात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी, बीड जिल्हा परिषद, तसेच लाभार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत सर्वांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी मुंबई उपनगरचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत व प्रतिनिधी, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित यांनी देखील पोलीस स्मृतिस्तंभाजवळ जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या संदेश वाचनातून गेल्या वर्षभरात देशात हौतात्म्य प्राप्त झालेल्या ३४ पोलीस अधिकारी व १५७ पोलीस अंमलदार अशा एकूण १९१ वीर शहीदांना त्यांच्या अतुलनीय बलिदानाबद्दल श्रद्धांजली वाहिली.

यावेळी शहीद झालेल्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांची नावे वाचनानंतर पोलीस बँड पथकाद्वारे सलामी शस्त्र धून वाजविण्यात आली. तसेच गणवेशधारी अधिकारी व जवानांनी सलामी दिली. पोलिसांतर्फे अभिवादन म्हणून बंदुकीच्या तीन फैरी झाडण्यात आल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी निमंत्रित देश-विदेशी पाहुणे, वरिष्ठ पोलीस अधिकारी व हुतात्म्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

## तुमचे सिनेमे काय फक्त भाजपावालेच बघत नाहीत



**रायगड :** सध्या महेश कोठारे यांनी दिवाळी पहाट कार्यक्रमात दिलेल्या एका विधानाची जोरदार चर्चा सुरू आहे. या दिवाळी पहाटच्या कार्यक्रमात महेश कोठारे यांनी भाजपाला खुला पाठिंबा दर्शवला. तसंच आपण मोदी आणि भाजपाचे भक्त असल्याचं म्हटलं. यावर आता राजकारणातल्या वर्तुळात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहे. शिवसेना नेते संजय राऊत यांनी यावर त्यांची प्रतिक्रिया व्यक्त केली.

पत्रकार परिषदेमध्ये संजय राऊत म्हणाले की, महेश कोठारे भाजपाचा महापौर होईल असं म्हणतायेत... नक्की ते मराठीच आहेत ना? मला शंका वाटत आहे. ते कोणताही पक्षाचे असू द्या, प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे. पण आपण एक कलाकार आहात. तुमचे सिनेमे फक्त भाजपाच्या लोकांनी पाहिलेले नाहीत. तुम्ही असा बोललात तर तात्या विंचू चावेल तुम्हाला.

प्रवीण दरेकर यांनी दिवाळी पहाट कार्यक्रमा आयोजित केलेला जिथे महेश कोठारे यांना पाहुणे म्हणून आमंत्रण होतं. त्यावेळी त्यांनी भर कार्यक्रमात म्हटलेले की हा घरचा कार्यक्रम आहे कारण भाजप म्हणजे आपलं घर आहे. मी स्वतः भाजपाचा भक्त आहे. मी मोदीजींचा भक्त आहे. पुढच्या वर्षी दिवाळीच्या कार्यक्रम नंतर मुंबईवर कमळ फुललेलं असेल याची मला गॅरंटी आहे. आपल्याला नगरसेवक निवडून द्यायचाच आहे पण या वेळेचा महापौरही इथूनच निवडून गेलेला असेल. कोठारींच्या या विधानामुळे राजकारण बरच टाकलं आणि त्यानंतर संजय राऊत यांनी यावर प्रतिक्रिया दिली.

## राष्ट्रवादीचे विकास गायकवाड यांचा शिंदे गटात प्रवेश



**रायगड :** दिवाळीच्या मुहूर्तावर शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनी राष्ट्रवादीला मोठा झटका दिला आहे. खासदार सुनील तटकरे यांचे अत्यंत निकटवर्तीय आणि राष्ट्रवादीचे सक्रीय कार्यकर्ते विकास गायकवाड यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. गायकवाड यांच्या प्रवेशाने रायगडमध्ये राष्ट्रवादीच्या गोटात खळबळ उडाली आहे. आगामी निवडणुकांपूर्वी ही मोठी राजकीय उलथापालथ मानली जात आहे.

गोरेगाव विभागातील सुनील तटकरे यांचे कार्यकर्ते विकास गायकवाड हे सुनील तटकरे यांचे विश्वासू शिलेदार मानले जात होते. त्यामुळे गायकवाड यांची गळचेपी म्हणजे तटकरे यांच्यासाठी थेट वैचारिक आणि संघटनात्मक हादरा मानला जातोय. या प्रवेश सोहळ्यावेळी भरत गोगावले यांनी सूचक भाष्य केलं. 'राजकारणात योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्यास जिल्ह्याचं चित्रच बदलू शकतं,' असं त्यांनी वक्तव्य केलं. त्यामुळे त्यांच्या पुढील रणनीतीबाबतही संकेत मिळाले आहेत.

दरम्यान, महायुतीत असूनही शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीत समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध तयारी सुरू केल्याची चर्चा आहे. त्यामुळे रायगडमध्ये महायुतीतच महाभारत रंगण्याची चिन्हं स्पष्ट झाली आहेत. रायगड जिल्ह्यात आता केवळ पक्षांतराचे नव्हे, तर वर्चस्वाच्या रणधुमाळीचे दिवस सुरू झाल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, फक्त रायगड नाही तर अनेक ठिकाणी महायुतीत धुसफूस सुरु असल्याचं बघायला मिळत आहे. सोलापुरात तर राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन माजी आमदार भाजपात प्रवेश करत आहेत. दुसरीकडे पुण्यात शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांच्याकडून भाजप नेत्यांवर वारंवार वेगवेगळ्या प्रकारचे गंभीर आरोप केले जात आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




# आयएनएस विक्रांतने पाकिस्तानची झोप उडवली

## नौदलाबरोबर दिवाळी साजरी करताना पंतप्रधान मोदींचे भाष्य

**रायगड :** पणजी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाची दिवाळी स्वदेशी बनावटीच्या विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत वरील नौदल कर्मचाऱ्यांसोबत साजरी केली. यावेळी त्यांनी नौदलाच्या पराक्रमाचे कौतुक केले. या युद्धनौकेमुळे 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानची झोप उडाली होती, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी गोवा आणि कारवारच्या किनाऱ्यावरील आयएनएस विक्रांतला भेट देऊन भारतीय सशस्त्र दलांसोबत दिवाळी साजरी करण्याची परंपरा कायम ठेवली. आयएनएस विक्रांतवर बसून, पंतप्रधान मोदी मिग-२९के लढाऊ विमानांच्या बाजूने असलेल्या फ्लाईटडेकवर गेले आणि दिवसा आणि रात्री दोन्ही वेळी मिग २९ लढाऊ विमानांच्या लहान



धावपट्टीवर उड्डाण आणि उतरण्याच्या हवाई शक्तीचे प्रात्यक्षिक पाहिले. भेटीदरम्यान, त्यांनी विमानवाहू जहाजावरील नौदलाच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या समर्पणाचे कौतुक केले. त्यांनी जहाजावरील नौदलाच्या कर्मचाऱ्यांना मिठाई वाटली आणि संबोधित केले.

### दहशतवादापासून मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सांगितले की भारत नक्षलवादी-माओवादी दहशतवादापासून मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर आहे आणि या समस्येपासून मुक्त असलेले १०० हून अधिक जिल्हे यावर्षी सन्मानाने दिवाळी साजरी करतील. गोव्याच्या किनाऱ्यावरील आयएनएस विक्रांत युद्धनौकेवर सशस्त्र दलाच्या जवानांना संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी सुरक्षा दलांच्या शौर्याचे कौतुक केले आणि माओवादी दहशतवादाविरुद्ध त्यांनी महत्त्वपूर्ण यश मिळवल्याचे सांगितले. पूर्वी देशातील १२५ जिल्हे माओवादी दहशतवादाने प्रभावित होते, परंतु आज ही संख्या फक्त ११ जिल्ह्यांवर आली आहे.

### पाकिस्तानला गुडघे टेकायला भाग पाडले : मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूर दरम्यान नौदलाचा विस्मय, हवाई दलाचे असाधारण कौशल्य, लष्कराचे शौर्य आणि तिन्ही सशस्त्र दलांमधील असाधारण समन्वय यामुळे पाकिस्तानला काही क्षणातच गुडघे टेकायला भाग पाडले. स्वदेशी बनावटीची विमानवाहू युद्धनौका ही 'स्वावलंबित भारताचे शक्तिशाली प्रतीक' आहे आणि ती नौदलाला सोपवल्याने एक मोठा वसाहतवादी वारसा कसा उलथून पडला आहे.

---

## वाटेत गाडी थांबवली अनब कालव्यात उडी ; पाच महिन्यातच संसाराची माती

**लखनऊ :** एका व्यक्तीने पत्नीशी झालेल्या वादानंतर आपल्या आयुष्याची अखेर केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. लखनऊमध्ये ही घटना घडल्याची माहिती आहे. लखनऊच्या पीजीआय परिसरातील कल्ली पश्चिम येथील रहिवासी २६ वर्षीय बबलू शर्माने आले आयुष्य संपवले आहे. पत्नीशी झालेल्या वादानंतर बबलूने चिन्हाट येथील इंदिरा कालव्यात उडी मारली. घटनेवेळी बबलूने त्याची पत्नी पूजाला बाईकवरून काही अंतरावर सोडले होते आणि नंतर त्याने कालव्यात उडी म ारली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.रविवारी (१९ ऑक्टोबर) दुपारी पोलिसांनी इंदिरा कालव्यातून त्याचा मृतदेह ताब्यात घेतला. घटनेच्या दिवशी बबलूच्या पत्नीने त्याच्याकडे तिला आईवडिलांच्या घरी नेऊन सोडण्यास सांगितलं होतं. यामुळे बबलू संतापला होता. मृताच्या कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, बबलूला पत्नीला माहेरी जाऊ द्यायचे नव्हते. मात्र, पत्नी म ाहेरी जाण्यावर अडली होती. त्यामुळे





त्यांच्यात वाद झाला.पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, बबलू मूळचा बाराबाकीतील धारुपूर असंध्रा गावचा रहिवासी होता आणि तो व्यवसायाने सुतार होता. त्याचे सुमारे पाच महिन्यांपूर्वी दरियाबाद येथील रहिवासी पूजाशी लग्न झाले होते. बबलूचे मामा श्रीकांत यांनी सांगितले की, लग्न झाल्यापासून त्यांच्यात अनेकदा क्षुल्लक कारणांवरून भांडणं होत होती. शनिवारी त्यांच्यात वाद झाला, त्यानंतर बबलू आपल्या पत्नीला तिच्या माहेरी सोडण्याच्या बहाण्याने घराबाहेर पडला.चिन्हाट येथील इंदिरा कालव्यावर पोहोचल्यावर, बबलूने आपल्या पत्नीला बाईकवरून खाली उतरवलं आणि काही अंतरानंतर त्याने कालव्यात उडी मारली.

## संशयावरून तरुणाला केली बेदम मारहाण

**मुंबई :** गोरेगाव परिसरात सोमवारी रात्री (२० ऑक्टोबर) एका तरुणाला मोबाईल चोर समजून जमावाने बेदम मारहाण केली आणि या निर्दयी हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. मृत तरुणाचे नाव हर्षल परमा (वय २६) असे असून, तो परिसरात राहत होता.

गोरेगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हर्षल परमा याला स्थानिकांनी चोरीच्या संशयावरून पकडले. अफवांच्या भरात आणि संशयाच्या आधारे काही लोकांनी त्याचे हात-पाय बांधले आणि रागाच्या भरात त्याला निर्दयपणे मारहाण केली. या हल्ल्यात त्याला गंभीर दुखापत झाली आणि तो रस्त्यावरच कोसळला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेची बातमी समजताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि चौकशी सुरू केली. यावरून पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सलमान मोहम्मद खान, इसामुल्ला खान, गौतम आणि राजीव गुप्ता या चौघांना अटक केली.

## काशिमीरा परिसरात मोठा राडा, २५ रिक्षा फोडल्या, मुलींची छेड काढली

**मुंबई :** काशिमीरा परिसरात मोठा राडा झाल्याची माहिती समोर येत आहे. काशिमीरा परिसरात दोन गटात तुफान राडा झाला आहे. खरंतर सोमवारी संध्याकाळी दोन गटात वाद झाला होता. त्यानंतर आजदेखील हा वाद उफाळला. या वादात परिसरातील वाहनांची तोडफोड करण्यात आली आहे.

दोन गटांच्या या वादात तब्बल २५ रिक्षांची तोडफोड करण्यात आली आहे. या राड्यानंतर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिसरात जावून नागरिकांची भेट घेतली आहे. त्यांनी नेमकी काय घटना घडली याची माहिती घेतली. यानंतर त्यांनी माध्यमांना घटनेची सविस्तर माहिती दिली. प्रताप सरनाईक यांनी दिलेली माहिती ही अत्यंत धक्कादायक अशीच आहे. कारण या घटनेत परिसरातील महिला आणि मुलींची छेड आरोपींनी काढल्याचा दावा प्रताप सरनाईक यांनी केला आहे. त्यामुळे महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.माशाचा पाडा या



परिसरामध्ये आज सकाळी काही गुंडांनी या परिसरातील आमच्या आया-बहिणींची छेड काढली. गुंडांनी एका लहान मुलीची देखील छेड काढण्याचा प्रयत्न केला. मी त्या मुलीला पोलीस ठाण्याला पाठवलं आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची सूचना मी पोलिसांना केलेल्या आहेत. त्यानुसार गुन्हा दाखल होईलच. पण लोकवस्ती झपाट्याने वाढत आहे. ही लोकवस्ती झपाट्याने वाढत असताना गुंडगिरी फार मोठ्या प्रमाणात वाढली आहे', असा आरोप प्रताप सरनाईक यांनी केला.या परिसरात गांजा, चरस सारखे अंमली पदार्थ मोठ्या प्रमाणात विकले जातात, असं सांगितलं जातं.

---

# दुपारी मोठ्या भावाला धमकी, संध्याकाळी लहान भावाला संपवल

## भाजप नेत्याच्या पुतण्याच्या हत्येची थरारक कहाणी..

**लखनऊ :** मुरादाबाद शहरातील कटघर बीचजवळील छोटा छता परिसरात बारावीत शिकणाऱ्या ठाकूर विनायक सिंग (१७) या विद्यार्थ्याला त्याच्या शेजाऱ्यांनी चाकूने भोसकून त्याचा खून केला. घराबाहेर शिवीगाळ केल्याबद्दल त्याने विरोध केला होता, म्हणून त्याची हत्या करण्यात आली. या विद्यार्थ्याचे काका अनुराग सिंग हे भाजपचे माजी प्रादेशिक मीडिया प्रभारी आहेत. सध्या पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत. पवन कुमार सिंग यांचा मुलगा विनायक सिंग हा उप-जगन्नाथ सिंह सरस्वती शिशु मंदिरात १२ वीचा विद्यार्थी होता. मंगळवारी संध्याकाळी ७ वाजता तो त्याच्या घराजवळ उभा होता. तेव्हा शेजारी मनोज शर्मा यांचा मुलगा फुले कौशिक दारूच्या नशेत असताना आला आणि त्याला शिवीगाळ करू लागला. विनायकने आक्षेप घेतला आणि त्याला निघून जाण्यास सांगितले. यावेळी फ ुले आणि विनायकमध्ये वाद झाला. आरडाओरड ऐकून फुलेचा भाऊ आनंद कौशिक, त्याचे वडील मनोज आणि काका अनिल कौशिक हे तिथे आले. त्यांनी विनायकला मारहाण केल्याचा आरोप आहे. हल्ल्यादरम्यान, आरोपीने त्याच्या पोटात वार केले, ज्यामुळे तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. इतक्यात विनायकचे कुटुंबही घराबाहेर आले, त्यांना पाहताच आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. कुटुंबाने जखमी विनायकला कॉसमॉस रुग्णालयात नेले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसांनी सांगितले की, आरोपींना अटक करण्यासाठी पोलीस पथके तैनात करण्यात आली आहेत. काही व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे आणि त्यांची चौकशी सुरू आहे.फुले याने मंगळवारी दुपारीही परिसरात गोंधळ घातला होता. दुचाकीच्या धडकेच्या वादातून त्याने विनायकचा मोठा भाऊ अभिषेक सिंग यालाही जीवे मारण्याची धमकी दिली होती. संध्याकाळी दारूच्या नशेत फ ुले याने पुन्हा गोंधळ घातला आणि विनायकची हत्या केली, अशी माहिती आहे.

विनायकच्या कुटुंबात त्याचे वडील





पवन सिंग, आई नीलम सिंग,भाऊ अभिषेक सिंग आणि बहीण आयुषी सिंग आहे. दिवाळीच्या दिवशी विनायकने त्याचा भाऊ, वडील आणि काका अनुराग सिंग यांच्यासोबत फटाके पेटवले आणि तो खूप आनंदी होता. मंगळवारी संध्याकाळी तो फटाके फोडण्यासाठीच बाहेर पडला होता.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# बुद्धीबळ जगताचा तेजस्वी तारा निखळला!

## अवघ्या २९ व्या वर्षी ग्रँडमास्टर डॅनियलचा शेवट

**नवी दिल्ली :** अमेरिकेच्या बुद्धीबळ क्षेत्राला एक मोठा धक्का बसला आहे. आपल्या अफाट प्रतिभेने संपूर्ण जगाला मंत्रमुग्ध करणारा, 'बाल बुद्धिमत्ता' (चाइल्ड प्रॉडिजी) म्हणून उदयास आलेला आणि डिजिटल युगातील बुद्धीबळाचा आवाज बनलेला ग्रँडमास्टर डॅनियल नरोडित्स्की याचे सोमवारी दुःखद निधन झाले. नियतीने त्याला अवघ्या २९ व्या वर्षी हिरावून घेतले, ज्यामुळे बुद्धीबळ जगतात एक पोकळी निर्माण झाली झाल्याची भावना व्यक्त होत आहे. नरोडित्स्की याच्या निधनाचे कारण समजू शकलेले नाही.

डॅनियलच्या अचानक जाण्याने त्याच्या चाहत्यांवर आणि बुद्धीबळ समुदायावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्याचे कुटुंब गहिऱ्या शोकात बुडाले आहे. शार्लोट बुद्धीबळ केंद्राने सामायिक केलेल्या निवेदनात कुटुंबाने आपल्या भावना व्यक्त केल्या. 'डॅनियलचे बुद्धीबळाच्या खेळावर असलेले अतूट प्रेम आणि निष्ठा, तसेच त्याने आम्हा सर्वांना दररोज दिलेला निर्मळ आनंद आणि प्रेरणा... या सुंदर आठवणींसाठी आपण त्याला कायम स्मरणात ठेवूया.'

नरोडित्स्कीने १२ वर्षांखालील जागतिक विजेतेपद जिंकले होते. त्यानंतर अवघ्या १८ व्या वर्षी त्यांनी ग्रँडमास्टर हा किताब पटकावला, जो जागतिक बुद्धीबळ क्षेत्रातील सर्वात मोठा सन्मान आहे. कॅलिफोर्नियात जन्मलेल्या या खेळाडूने पौगंडावस्थेत असतानाच बुद्धीबळाच्या रणनीतीवर पुस्तके लिहिण्यास सुरुवात केली आणि जागतिक क्रमवारीतील आपले स्थान उंचावले. युक्रेन आणि अझरबैजानमधून स्थलांतरित झालेल्या ज्यू पालकांच्या पोटी जन्मलेल्या नरोडित्स्कीने बुद्धीबळ विश्वात अद्वितीय कामगिरी केली. कॅलिफोर्नियातील सॅन माटेओ काउंटी येथे त्याचे बालपण गेले. अवघ्या १४ व्या वर्षी त्याने आपले पहिले बुद्धीबळातील रणनीतीविषयक पुस्तक 'मास्टरिंग पोझिशनल चेस' प्रकाशित केले. या महत्त्वपूर्ण कार्यामुळे तो जगातील सर्वात तरुण बुद्धीबळ लेखकांपैकी एक म्हणून गणला जाऊ लागला.

### पारंपरिक आणि जलदगतीमधील यश

पारंपरिक बुद्धीबळ प्रकारात त्याने सातत्याने जागतिक टॉप २०० खेळाडूंमध्ये आपले स्थान पक्के केले होते. तसेच, त्याने ब्लिट्झ चेस नावाच्या जलदगती प्रकारातही उत्कृष्ट कामगिरी केली आणि टॉप २५ मध्ये स्थान राखले होते. नरोडित्स्कीने नुकतीच ऑगस्टमध्ये यू.एस. राष्ट्रीय ब्लिट्झ चॅम्पियनशिप जिंकली होती. २०२१ मध्ये, त्याने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या आणि अमेरिकेचा तत्कालीन विजेते फॅबियानो कारुआना याचा पराभव करून आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठी कामगिरी नोंदवली होती.



### डिजिटल युगातील बुद्धीबळाचा प्रणेता

नरोडित्स्कीने लाइव्हस्ट्रीम आणि ऑनलाईन शिकवणीतून शेकडो वर्षांच्या या खेळाला डिजिटल युगात आणले. YouTube आणि Twitch यांसारख्या प्लॅटफॉर्मवर हजारो चाहते त्यांचे शैक्षणिक व्हिडिओ पाहत असत, ज्यामुळे नरोडित्स्की याला आधुनिक बुद्धीबळातील सर्वात प्रभावी व्यक्ती मानले जाते. त्याचे समकालीन ग्रँडमास्टर देखील नरोडित्स्की याच्या लाइव्हस्ट्रीमिंग आणि सम लोचनाद्वारे या खेळाला अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे श्रेय देतात.

---

# रोहित, कोहलीच्या भवितव्याचा या मालिकेतच फैसला होईल





**सिडनी :** ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या वन-डे मालिकेतील विराट कोहली आणि रोहित शर्मा यांची कामगिरी, ही भारतीय स्टार जोडी २०२७ च्या विश्वचषकापर्यंत खेळू शकेल की नाही, हे ठरवेल, असा दावा माजी ऑस्ट्रेलियन कर्णधार रिकी पाँटिंगने केला आहे. मार्च महिन्यानंतर आपला पहिलाच व्यावसायिक सामना खेळणाऱ्या विराट व रोहित यांना पर्थच्या उसळत्या खेळपट्टीवर तग धरता आला नाही. भारतीय संघाला या सामन्यात ७ गडी राखून पराभव पत्करावा लागला. या पार्श्वभूमीवर पाँटिंग बोलत होता.

'आयसीसी रिव्ह्यू' कार्यक्रमात भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्यासोबत बोलताना पाँटिंग म्हणाला, दोन्ही दिग्गज खेळाडूंनी केवळ २०२७ च्या विश्वचषकाचा विचार करण्याऐवजी अल्पकालीन ध्येये निश्चित करणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा तुम्ही मोठ्या विश्रांतीनंतर परतता, तेव्हा साहजिकच तुमच्या खेळात पूर्वीची लय नसते. कोणत्याही परदेशी संघासाठी ऑस्ट्रेलियात पोहोचल्यानंतर दोन दिवसांतच पर्थसारख्या मैदानावर खेळणे आणि तेथील परिस्थितीशी जुळवून घेणे सोपे नसते, विशेषतः जेव्हा खेळपट्टीवर अतिरिक्त उसळी असते आणि समोर दर्जेदार वेगवान गोलंदाज असतात; पण मला वाटते की केवळ वेळच हे ठरवेल, असे रवी शास्त्री यांप्रसंगी म्हणाले.

# स्पीड नाही, स्पिनचा कहर!

## वनडेत फिरकीपटूंनीच टाकली सर्व ५० षटके

**नवी दिल्ली :** वेस्ट इंडिज संघाने बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात इतिहास रचला. त्यांनी एकाही जलदगती गोलंदाजाचा वापर न करता संपूर्ण ५० षटके केवळ फिरकीपटूंनीच टाकवली. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात असा पराक्रम करणारा वेस्ट इंडिज हा पहिला संघ ठरला आहे. या अनोख्या डावपेचाचा फायदा होऊन कॅरेबियन संघाने बांगलादेशला २१३ धावांवर रोखले.

एकही जलदगती गोलंदाज वापरला नाही

संघात अष्टपैलू जस्टिन ग्रीव्ह्स हा एकमेव जलदगती गोलंदाज होता, परंतु विंडिजने त्याचा अजिबात वापर केला नाही. त्याऐवजी, त्यांनी पार्ट-टाईम गोलंदाज एलिक एथेनाझेला संधी दिली. त्याने उत्कृष्ट कामगिरी करत संपूर्ण १० षटके टाकली, ज्यात त्याने फक्त १४ धावा देऊन दोन बळी घेतले. डावखुरा फिरकीपटू गुडाकेश मोती हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने तीन बळी घेऊन वेस्ट इंडिजच्या फिरकी आक्रमणाचे नेतृत्व केले.

ही लढत पहिल्या सामन्यासाठी वापरलेल्या खेळपट्टीवरच खेळली गेली. ही खेळपट्टी धीमी होती. भेगा मोठ्या प्रमाणात होत्या. त्यावर चेंडूला चांगले वळण मिळत होते. त्यामुळे फलंदाजांची भंबेरी उडाली. त्यांना धावा करणे अवघड जात होते. त्यामुळे दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजने फिरकीवर अवलंबून राहण्याची रणनिती आखली होती.



### श्रीलंकेचा विक्रम मोडला

एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक फिरकी षटके टाकण्याचा यापूर्वीचा विक्रम श्रीलंकेच्या नावावर होता. त्यांनी १९९६ मध्ये पोर्ट ऑफ स्पेन येथे वेस्ट इंडिजविरुद्ध ४४ षटके फिरकी गोलंदाजी केली होती. त्या सामन्यात मुथैया मुरलीधरन, अरविंद डी सिल्वा, कुमार धर्मसेना, उपुल चंदना, सनथ जयसूर्या आणि हशन तिलकरत्ने यांसारख्या खेळाडूंनी मिळून ७ बळी घेतले होते आणि श्रीलंकेने ३५ धावांनी विजय मिळवला होता. श्रीलंकेने १९९८ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध आणि २००४ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धही असाच प्रयोग केला होता.

---

# पाक फलंदाजांचे केशव महाराजसमोर लोटांगण!

**सिडनी :** पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रावळपिंडीच्या मैदानावर मालिकेतील दुसरी कसोटी लढत सुरू आहे. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ ३३३ धावा काढून सर्वबाद झाला. यजमान संघ एकवेळ मोठ्या धावसंख्येच्या दिशेने वाटचाल करत होता, परंतु केशव महाराजच्या फिरकी गोलंदाजीने सामन्याचे चित्र पालटले.


केशव महाराजने एकट्याने पाकिस्तानच्या सात फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. महाराजने त्याच्या ४२.४ षटकांच्या स्पेलमध्ये १०२ धावा देत एकूण ७ बळी मिळवले. यासह त्याने पाकिस्तानच्या भूमीवर द. आफ्रिकेकडून सर्वोत्तम गोलंदाजी करण्याचा विक्रम आपल्या नावावर नोंदवला. महाराजच्या फिरकीपुढे यजमान संघाच्या फलंदाजांनी लोटांगण घातले. कसोटी कारकिर्दीतील त्याची ही १२वी पाच बळी घेण्याची आणि तिसऱ्यांदा सात किंवा त्याहून अधिक बळी घेण्याची किमया ठरली. या फिरकीपटूने शान मसूद, बाबर आझम, सऊद शकील, सलमान आगा यांसारखे महत्त्वाचे फलंदाज बाद केले. कसोटी संघात पुनरागमन करत असलेल्या केशव महाराजच्या या प्रभावी स्पेलमुळे द. आफ्रिका संघाने सामन्यात जोरदार पुनरागमन करण्यात यश मिळवले.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अंग्रेजों के जमाने का जेलर काळाच्या पडद्याआड!



**मुंबई :** दर्जेदार अभिनयाच्या जोरावर पाच दशकांपेक्षा जास्त काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे दिग्गज अभिनेते गोवर्धन असरानी यांचे निधन झाले आहे. हिंदी सिनेसृष्टीत एक कसलेला आणि बहुआयामी अभिनेता म्हणून त्याचा नावलौकिक होता. आतापर्यंत त्यांनी अनेक चित्रपटांत विनोदी तसेच इतर भूमिका साकारल्या. त्यांनी साकारलेल्या काही भूमिका तर कायम स्मरणात राहणाऱ्या आहेत.

१९६७ साली त्यांचा गुजराती भाषेतला एक चित्रपट आला होता. त्यांच्या करिअरमधील हा त्यांचा पहिला चित्रपट होता. त्यानंतर हरे कांच की गुडीया हा चित्रपट आला. त्यांनी नमक हराम (१९७३) या चित्रपटात केलेल्या भूमिकेचे फारच कौतुक झाले. शोले चित्रपटात त्यांनी साकारेलल्या जेलरच्या भूमिकेचे सर्वत्र कौतुक झाले होते. त्यानंतर मात्र त्यांनी कधी मागे वळून पाहिलेच नाही. पुढे कोशीश (१९७२), बावर्ची (१९७२), परिचय (१९७२), अभिमान (१९७३), पलकोंकी छाव मे (१९७७), बंदीश (१९८०) यासारख्या चित्रपटांत काम केले.

गोवर्धन असरानी यांचे आज (२० नोव्हेंबर) सायंकाळी चार वाजता निधन झाले. दीर्घकाळापासून ते एका आजारावर उपचार घेत होते. शरीराने उपचाराला साथ न दिल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. ते मूळचे राजस्थान राज्यातील जयपूर येथील रहिवासी होते. गेल्या अनेक वर्षांपासून असरानी यांची सर्व कामे त्यांचे मॅनेजर बाबूभाई थिबा हेच पाहायचे. त्यांनीच असरानी यांच्या निधनाबाबत माहिती दिली आहे. गेल्या चार दिवसांपासून त्यांची प्रकृती बिघडली होती. त्यांना आरोग्य निधी या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना फुफ्फुसाशी संबंधित आजार होता, असे बाबूभाई थिबा यांनी सांगितले.

अभिनेते असरानी यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक अजरामर भुमिका केल्या. यात हिंदी चित्रपटसृष्टीतील माईलस्टोन ठरलेल्या शोले पिक्चरमधील जेलर ची भूमिका हे आजही प्रेक्षकांच्या मनात घर करुन आहे. 'हम अंग्रेज के जमाने के जेलर है' असे म्हणून खूप शूरवीर असल्याचे भासवणारे व प्रत्यक्षात वेगळेच असणारे पात्र आजही जसेच्या तसे लोकांना आठवते. त्याचे रिल्स अजूनही व्हायरल होतात.

असरानी यांनी जो जीता वही सिकंदर (१९९२), गर्दीश (१९९३), घरवाली बहरवाली (१९९५) बडे मियाँ छोटे मियाँ (१९९८) सारख्या चित्रपटांमध्ये विनोदी भूमिका साकारल्या. त्यानंतर हेरा फेरी (२०००), हलचल (२००४), गरम मसाला (२००५), चुप चुप के (२००), भागम भाग (२००६), दे दना दान (२००९), बोल बच्चन (२०१२) यासारख्या अलिकडच्या चित्रपटांतही काम केले.

# कनिका माहेश्वरीचा अभिनयाला अलविदा, अभिनेत्रीने स्वीकारला भक्ती मार्ग



**मुंबई :** लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री कनिका माहेश्वरीने अचानक इंडस्ट्रीला अलविदा केलं आहे. कनिकाने आता भक्तीमार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. तिच्या या निर्णयाने चाहत्यांना आणि सहकलाकारांनाही धक्का बसला आहे.

दीया और बाती हम, कहानी घर घर की, राजा की आएगी बारात यांसारख्या मालिकांमधील तिच्या भूमिकांनी ती घराघरात पोहोचली होती.

मात्र आता अभिनेत्रीने सांगितले की, मला नेहमीच अध्यात्म आणि साधनेत शांतता मिळते. गेल्या काही वर्षांत मी खूप विचार केला आणि अखेर ठरवलं की आता पूर्णपणे भक्ती आणि ध्यानाच्या मार्गावर चालायचं आहे. दीया और बाती हम मालिकेतील तिच्या चुलबुली अभिनयाने सर्वांनाच भुरळ पाडले होते. कनिकाचा सोशल मीडियावर एक व्हिडियो व्हायरल होत आहे. ज्यामध्ये ती म्हणते - ३ वर्षे आधीच तिने ओशो आश्रममध्ये राहून ६ महिने नियो संन्यास घेतला आहे. या पोस्टवर तिच्या चाहत्यांनी भावनिक प्रतिक्रिया दिल्या आहेत. तिने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत आपला निर्णय जाहीर केलाय. कनिकाने सांगितलं की, तिने नियो संन्यास घेतला आहे. ती म्हणते, ही माळ साधारण वस्तू नाहीये. ही माझ्या भगवान ओशोच्या संन्यासाची माळ आहे. मी तर ३ वर्ष आधीच संन्यास घेतला होता. संन्यास म्हणजे नियो संन्यास. जसे की मी आता तुमच्या सोबत बसून बोलत आहे तर मी इथेच आहे. कुठेही गेलेले नाही. जर माझ्या आयुष्यात आपण अशा पद्धतीने जीवन जगत असो कॉन्शियस होऊन तर ...त्यामुळे खूप फर्क पडतो.'

# परिणीती चोप्रा झाली आई



**नवी दिल्ली :** बॉलिवूड अभिनेत्री परिणीती चोप्रा आई झाली आहे. तिचा पती आणि आम आदमी पक्षाचे नेते राघव चा यांनी सोशल मीडियावर ही आनंदाची बातमी शेअर केली. रविवारी सकाळी परिणीतीला रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची बातमी आली हे लक्षात घेण्यासारखे आहे. आता, तिने एका मुलाला जन्म दिल्याची बातमी समोर आली आहे.

राघव आणि परिणीतीने पोस्टमध्ये लिहिले आहे की, 'शेवटी! आमचा मुलगा आला आहे. या लहान पाहुण्या येण्यापूर्वी आयुष्य कसे होते हे आम्हाला खरोखर आठवत नाही. आमचे हात भरलेले आहेत आणि आमची हृदये आणखी भरलेली आहेत. आम्हा दोघांना एकमेकांची साथ आहे, आता आमच्याकडे सर्वकाही आहे. प्रेम आणि कृतज्ञतेने, परिणीती आणि राघव.' रविवारी सकाळी परिणीतीला दिल्लीतील रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची बातमी आली, ज्यामुळे चाहत्यांनी तिच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली. आता, तिने मुलाला जन्म दिल्याची आनंदाची बातमी आल्यानंतर, सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव झाला आहे.

# नेशनल अवॉर्डवरून विशालचा संताप



**मुंबई :** २०२३ साठी नुकतेच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर झाले असून याम ध्ये शाहरुख खानने सर्वोत्तम अभिनेता तर राणी मुखर्जीने सर्वोत्तम अभिनेत्रीचा सन्म ान पटकावला आहे. मात्र दरवेळीप्रमाणे याही वेळी या पुरस्कारांच्या निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. यावेळी दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता विशाल यांनी या पुरस्कार वितरण प्रक्रियेवर जोरदार टीका केली असून, संपूर्ण सिस्टमलाच त्यांनी बकवास असे म्हटले आहे.

एका अलीकडील मुलाखतीत विशाल यांनी राष्ट्रीय पुरस्कारांसंदर्भात आपली नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ङ्गमाझा अशा कोणत्याही पुरस्कारांवर विश्वास नाही. हे सगळं प्रकार म्हणजे केवळ एक पद्धतशीर वेडेपणा वाटतो. कसे काय फक्त चार लोक एका खोलीत बसून देशभरातल्या कोट्यवधी प्रेक्षकांसाठी बनलेल्या चित्रपटांमधून सर्वोत्तम अभिनेता, अभिनेत्री आणि सहाय्यक भूमिकांचा निर्णय घेऊ शकतात? हे चार लोक कोण आहेत जे संपूर्ण इंडस्ट्रीसाठी निर्णय घेतात?ङ्ख

विशाल तळीहरश्र यांचे म्हणणे आहे की, अशा पुरस्कारांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून, प्रेक्षकांच्या मतांचा विचार केला जात नाही. तुम्हाला सर्वेक्षण करायला हवे. लोकांची मते विचारात घेतली पाहिजेत. फक्त काही जणांनी दिलेला निर्णय ही काही खरी ओळख नसते. अशी कोणतीही पारितोषिकं मला नकोत. जर मला राष्ट्रीय पुरस्कार दिला गेला, तर मी तो कचरापेटीत फेकून देईन. आणि जर तो सोन्याचा असेल तर विकून त्याचे पैसे दान करीन, असंही त्यांनी ठामपणे सांगितलं.

# सलमान खानच्या विधानामुळे पाकिस्तानात तणाव



**नवी दिल्ली :** सलमान खानने अलीकडेच असे काही सांगितले ज्यामुळे तो लगेचच चर्चेत आला. जॉय फोरम २०२५ सौदी अरेबियातील रियाध येथे आयोजित करण्यात आला होता. सलमान खान, शाहरुख खान आणि आमिर खान यांनी या कार्यक्रमाला एकत्र हजेरी लावली. तिन्ही खानना एकाच मंचावर पाहणे चाहत्यांसाठी एक मेजवानी होती. पण एका संभाषणादरम्यान सलमानने असे काही सांगितले ज्यामुळे पाकिस्तानमध्ये संताप निर्माण झाला.

जॉय फोरम २०२५ कार्यक्रमात अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते, ज्यामध्ये सलमान, शाहरुख आणि आमिर देखील उपस्थित होते. तिन्ही कलाकारांनी जागतिक चित्रपट, भारतीय चित्रपट आणि त्यांच्या कारकिर्दीसह इतर विषयांवर चर्चा केली. सलमानने पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बलुचिस्तानवरही चर्चा केली. ते म्हणाले, 'आज सौदी अरेबियात एखादा हिंदी चित्रपट प्रदर्शित झाला तर तो सुपरहिट होतो. शिवाय, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम चित्रपटही तिथे चांगला व्यवसाय करत आहेत कारण अनेक देशांचे लोक इथे राहतात आणि काम करतात. आपल्या देशातील अनेक लोक इथे आले आहेत. बलुचिस्तान, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानचे लोक इथे काम करतात.'

सलमान खानच्या 'पीपल फ्रॉम बलुचिस्तान' या विधानाने एक नवीन वाद निर्माण केला आहे. सलमान खानचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. सलमान खानला खरोखरच सत्य माहित आहे का असा प्रश्न सर्वांना पडला आहे. त्याने चूक केली आहे, की ते त्याच्या तोंडून चुकून बाहेर पडले आहे, की सलमानने जाणूनबुजून असे विधान केले आहे. यामुळे सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पाकिस्तानमधील लोकांनी सलमान खानच्या विधानाला गांभीर्याने घेतले आहे आणि ते सोशल मीडियावर त्याला सक्रियपणे ट्रोल करत आहेत.

***

# आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मोठा दिलासा : २ लाख ७५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात १८५ कोटींचा मदतनिधी जमा...

## आतापर्यंत ५ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना ३५० कोटींची मदत वितरित...

**जनसंचलन/बुलढाणा**

सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नुकसानीपोटी मंजूर केलेला मदतनिधी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून दिवाळीपूर्वी केवळ दोन दिवसांत २ लाख ७५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. एकूण १८५ कोटी रुपयांचा मदतनिधी वितरित करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. अतिवृष्टी आणि पूरामुळे सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांचे मोठे नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी प्रशासनाने पंचनामे करून अहवाल राज्य शासनाकडे सादर केला होता. शासनाने मंजूर केलेली रक्कम युद्धस्तरावर वाटप करण्याचे काम करण्यात आले असून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात निधी जमा झाला आहे. यापूर्वीही राज्य शासनाच्या विविध निर्णयांनुसार जुलैपासून बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने मदत वितरित करण्यात आली आहे. आतापर्यंत ५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना एकूण ३५० कोटींपेक्षा जास्त मदतनिधी थेट शेतकऱ्यांचा खात्यात जमा करण्यात आला आहे. ॲग्रीस्टॅकअंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी अद्याप फार्मर आयडी काढला नाही त्यांनी जवळच्या सीएससी केंद्रावर जावून नोंदणी करुन फार्मर आयडी काढून घ्यावा. तसेच ॲग्रीस्टॅकअंतर्गत ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. ज्या शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही. अशा शेतकऱ्यांसाठीही निधी वितरणाची प्रक्रिया तातडीने सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# महादेवा योजनेअंतर्गत जिल्हास्तर फुटबॉल निवड चाचणी...

## निवडलेल्या खेळाडूंना लिओनेल मेस्सीसमवेत खेळण्याची संधी....




**जनसंचलन/बुलडाणा**

राज्यातील युवा फुटबॉलपटूंना करिअर घडविण्याची आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यासाठी ङ्गमहादेवाफ ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत १३ वर्षांखालील मुले व मुलींसाठी फुटबॉल निवड चाचण्या आयोजित करण्यात आली आहे. या चाचण्यांमधून निवड होणाऱ्या प्रतिभावान खेळाडूंना जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन () यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचा विकास, प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा एक भाग म्हणून राज्यभरातील १३ वर्षांखालील मुले व मुलींसाठी जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरीय फुटबॉल निवड चाचण्या आयोजित करण्यात येणार आहेत. या चाचण्यांमधून निवड होणाऱ्या प्रतिभावान खेळाडूंना १४ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची संधी मिळणार आहे. या अनुषंगाने बुलढाणा जिल्हा फुटबॉल निवड चाचणी दि. ३१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता सहकार विद्या मंदिर, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. या निवड चाचणीत १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१३ दरम्यान जन्मलेल्या मुले आणि मुली सहभागी होऊ शकतात. सहभागी खेळाडूंनी चाचणीच्या दिवशी आधारकार्ड व जन्मप्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच गुगल नोंदणी लिंकद्वारे पूर्वनोंदणी पूर्ण केलेली असावी. संबंधित निवड चाचणीबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा किंवा जिल्हा फुटबॉल संघटना, बुलढाणा यांच्याशी संपर्क साधावा. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शाळांनी आणि विद्यार्थी खेळाडूंनी या जिल्हास्तरीय फुटबॉल निवड चाचणीत मोठ्या संख्येने सहभाग व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि. एस. महानकर यांनी केले आहे.

# रब्बी हंगामात प्रमाणित बियाणे वितरणास सुरुवात; शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत सन २०२५-२६ मध्ये रब्बी हंगामासाठी अन्नधान्य, कडधान्य व पौष्टीक तृणधान्य पिकांच्या प्रमाणित बियाणे वितरणाचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकरी बांधवांनी आपल्या सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वेळेत अनुदानित बियाण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालयाचे तंत्र अधिकारी अजय वाढे यांनी केले आहे. या योजनेअंतर्गत हरभरा आणि ज्वारी पिकांसाठी बियाणे अनुदान दर निश्चित करण्यात आले आहेत. हरभरा १० वर्षांआतील वाणाकरिता २०७३.४ क्विंटल बियाण्यांचे वितरण ५० रुपये प्रति किलो अनुदान दराने करण्यात येणार आहे. तर १० वर्षांवरील वाणाकरिता २५ रुपये प्रति किलो अनुदान असेल. तसेच ज्वारी १० वर्षांआतील वाणाकरिता ४० क्विंटल बियाणे ३० रुपये प्रति किलो अनुदान दराने, आणि १० वर्षांवरील वाणाकरिता १७० क्विंटल बियाणे १५ रुपये प्रति किलो अनुदान दराने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बियाणे वितरण ङ्गप्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्यफ () या तत्वावर करण्यात येईल. यासाठी महाबीज, राष्ट्रीय बीज निगम व कृभको या संस्थांच्या अधिकृत वितरकांमार्फत शेतकऱ्यांना अनुदानित बियाणे मिळणार आहेत. शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी, सातबारा उतारा व आधार कार्ड असणे आवश्यक असून, एका शेतकऱ्याला केवळ १ हेक्टर मर्यादेतच प्रमाणित बियाण्याचा लाभ देण्यात येईल.



# राज ठाकरेंच्या दीपोत्सवाचं श्रेय फडणवीस सरकार लाटतंय? पर्यटन विभागाच्या पोस्टमुळे मनसेचा संताप...

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून दरवर्षी दिवाळीत छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे साजरा होणाऱ्या वरुन श्रेयवाद होण्याची चिन्हं आहेत. कारण महाराष्ट्र पर्यटन विभागाने सोशल मीडियावर दीपोत्सवाची काही क्षणचित्रं दाखवून मुंबईबाहेरील पर्यटकांना आवाहन केलं आहे. दुसऱ्यांचे चांगले कार्यक्रम आपलेच आहेत हे दाखवण्यापर्यंत सरकार जाईल असे वाटले नव्हते, अशा शब्दात मनसेच्या अधिकृत एक्स अकाऊण्टवरुन संताप व्यक्त करण्यात येत आहे. पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांना टॅग करुन प्रश्न विचारण्यात आले आहेत. गेल्याच आठवड्यात राज ठाकरे यांचे बंधू आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सहकुटुंब उपस्थितीत दीपोत्सवाचं उद्घाटन करण्यात आलं होतं. यावेळी ठाकरे बंधूंमधील एकी आणि दोन्ही कुटुंबांमधील एकोपा पाहायला मिळाला होता. महाराष्ट्र पर्यटन विभागाने त्यांच्या एक्स हॅण्डलवरुन मुंबईतील शिवाजी पार्क मैदान येथील दीपोत्सवाची काही क्षणचित्रं दाखवून पुढे हा अनुभव घ्यायला या, असं मुंबई आणि मुंबईबाहेरील पर्यटकांना आवाहन केलं आहे. दिवाळी हा हिंदूंचा सगळ्यात मोठा सण आहे. या सणाच्या निमित्ताने गेली १३ वर्ष महाराष्ट्र नवनिर्माण सेना शिवाजी पार्क मैदानावर दीपोत्सव करत आहे. हा दीपोत्सव जरी मनसे करत असली तरी तो पूर्ण अराजकीय राहील हे आम्ही पाहिलं, आणि आमचा उद्देश फक्त आणि फक्त लोकांना आनंद मिळावा हाच आहे आणि राहील असं मनसेने सोशल मीडियावर लिहिलं आहे. जेव्हा महाराष्ट्र सरकारचा एक विभाग या दीपोत्सवाचं मार्केटिंग हे स्वतः हा विभाग आयोजित करत असल्यासारखं दाखवतं, तेव्हा विशेष आश्चर्य वाटलं. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला याचं अगदी छोटंसं श्रेय दिलं असतं तर निश्चित आम्हाला आनंद झाला असता, सरकारच्या मनाचा उमदेपणाही दिसला असता. परंतु नाशिकमध्येही जे मनसेने केलं, ते पुढे तत्कालीन सरकारनेच केलं अशी जाहिरातबाजी झाली. तुमचे नेते ते आमचे नेते, तुमचा पक्ष आमचा पक्ष अशी कार्यपद्धती सत्ताधारी पक्षाची आहे हे दिसतंच आहे. पण आता दुसऱ्यांचे चांगले कार्यक्रम सुद्धा आपलेच आहेत हे दाखवण्यापर्यंत सरकार जाईल असे वाटले नव्हतं! अशी खंत व्यक्त करण्यात आली आहे. आम्ही मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने एक अभिजात कार्यक्रम यावर्षी केला होता, दीपोत्सव तर असतोच, पण असे सामान्यांना




आनंद देणारे अनेक उपक्रम आम्ही करत राहणार आहोतच. त्यावेळी देखील पर्यटन विभागाला ते आमचे आहेत म्हणण्याचा मोह होईल इतके ते छान करु, फक्त त्यावेळेस त्याचं श्रेय आमच्या पक्षाला जरूर द्या म्हणजे झालं! असा टोलाही सरकारला लगावण्यात आला आहे.

## गो. से. महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न...

**जनसंचलन/ खामगाव**

स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव द्वारा संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयात १ मार्च २०२५ रोजी माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. या मेळाव्याकरिता प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मा. ना. ॲड. आकाशजी फुंडकर, कामगार मंत्री तथा पालकमंत्री अकोला जिल्हा मुंबई, डॉ. सुरेंद्र जैन, सुप्रसिद्ध चिकित्सक खामगाव, तसेच मा. सौ. शिल्पा पवार (चव्हाण) मुख्य कोषागार अधिकारी (उपसंचालक संवर्ग), अमरावती हे लाभले होते. उद्घाटनीय सगारंभाचे अध्यक्षस्थानी विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुभाषजी बोबडे हे होते. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष ॲड. अनिलजी व्यास, व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर हेही याप्रसंगी मंचावर उपस्थित होते. विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सन्माननीय पदाधिकारी व सदस्य, माजी विद्यार्थी संघटनेच्या उपाध्यक्षा प्रा. सौ. विद्याताई. कावडकर, सचिव श्री. आकाशजी अग्रवाल तसेच संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य हेही यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष ॲड. अनिल व्यास यांनी माजी विद्यार्थी संघटनेचे उद्देश, कार्य आणि भविष्यकालीन योजना याबद्दल सविस्तर माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी महाविद्यालयाच्या आजवरच्या यशस्वी घोडदौडीचा तसेच अलीकडेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या नवीन सोयी सुविधा व महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी आपआपल्या क्षेत्रात मिळविलेले यश यांचा गौरवपूर्ण आलेख सादर केला. या सर्व वाटचालीत महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी सदैव मोलाचे सहकार्य केले आहे असेही त्यांनी म्हटले. या प्रसंगी तिन्ही प्रमुख अतिथींनी आपापले मनोगत व्यक्त केले व महाविद्यालयाने आपल्या जडणघडणीत व यशात सिंहाचा वाटा उचलल्याचे कृतज्ञतापूर्वक नमूद केले. या संमेलनाकरिता माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. याप्रसंगी महाविद्यालयाच्या वरिष्ठ व नामांकित माजी विद्यार्थ्यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला, काही माजी विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपले मनोगत व्यक्त करीत महाविद्यालयाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली व आपण महाविद्यालयासाठी सर्वतोपरी प्रकारे मदत करण्यास सदैव सज्ज असल्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुभाषजी बोबडे यांनी सर्वांच्या सहकार्याने महाविद्यालयाने गाठलेले यश अधिकाधिक उज्वल करण्याचा मानस व्यक्त केला श्री. स्वप्नील वसतकर महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतल.अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तिक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४